PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Thorlee Jaau
Year: 1982

Song: Pujiti Manglagour
Lyricist: Sudhir Moghe

एका फुलाच्या चार पाकळया
एका फुलाच्या चार पाकळया
पूजिती मंगळागौर गं
पूजिती मंगळागौर
दिसाया साऱ्या जरी निराळया
एकाच गंधात चूर गं
पूजिती मंगळागौर

माझ्या माहेरी भर दुपारी
पुनव भरास येई
दुधात न्हाती चांदण्या कोटी
त्यांचाच कापूस होई
माझ्या वऱ्हाडी साऱ्या बिऱ्हाडी
माझ्या वऱ्हाडी साऱ्या बिऱ्हाडी
वाहतो सुखाचा पूर
पूजिती मंगळागौर गं
पूजिती मंगळागौर

सासर माझं बाई गोडीचं
माहेर जीवाच्या ओढीचं
ज्वारीच्या सोनेरी डौलाचं
सुपीक गव्हाळ कांतीचं
खानदेश माझा
मुलुखांचा राजा
खानदेश माझा
मुलुखांचा राजा

न्याराच त्याचा बाई नूर
पूजिती मंगळागौर गं
पूजिती मंगळागौर

तांबडी वाट डोंगर घाट
उंच उंच माडांची राई घनदाट
पाटांचा वेढा
कोंडयाचा मांडा
घराघरातून सुगरण हात
कोकणची वेल
कुठंही फुलेल
कोकणची वेल
कुठंही फुलेल
जाऊ दे किती दूर दूर
पूजिती मंगळागौर गं
पूजिती मंगळागौर

इथेच जन्मलो खेळलो वाढलो
नांदतो आजही इथेच गं
मस्तकी साऱ्यांच्या एकच आभाळ
सर्वांना आधार भुईच गं
नावे निराळी रूपे निराळी
नावे निराळी रूपे निराळी
श्वासांचा एकच सूर
पूजिती मंगळागौर गं
पूजिती मंगळागौर

PlanetRead

Literacy for a Billion

एका फुलाच्या चार पाकळया
एका फुलाच्या चार पाकळया
पूजिती मंगळागौर गं
पूजिती मंगळागौर

दिसाया साऱ्या जरी निराळया
एकाच गंधात चूर गं
पूजिती मंगळागौर

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*